# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/05/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यु

१) पो.स्टे. कुही :– अंतर्गत २२ कि.मी. अंतरावरील मौजा कुही फाटा येथे दिनांक २६/०५/२०२३ चे १९/३० वा. ते १९.४५ वा. दरम्यान वाहन चालक **मृतक नामे:– गौरव मनोज मानापुरे वय २७ वर्ष रा. कावरापेठ नागपुर** हा आपली टि.व्ही. एस. स्टार मोटरसायकल क्र. एम. एच.–४९ टि.– ४०३८ हा उन्द्री शिवारात अपघात स्थितीत रोडवर पडलेल्या स्थितीत होता. कोणीतरी अज्ञात वाहनाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकल क्र. एम. एच.–४९ टि.– ४०३८ च्या चालकास धडक दिली. चालक रोडवर पडुन त्याचे डोक्याला व हातापायाला गंभीर मार लागल्याने त्याला पुढील उपचारासाठी मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता तो उपचारा दरम्यान मरण पावला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक फौजदार संजय कुलकर्णी ब. नं. १५८९ रा. पो.स्टे. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अज्ञात चालकाविरुध्द कलम २७९, ३०४, (अ) भादवि. सहकलम १८४/१७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी हा घटनास्थळावरून पसार झाला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी/ सोनकुसरे पोस्टे कुही मो. नं. ९२१५४२९१८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा राजकमल हॉटेल जवळ येथे दिनांक २८/०५/२०२३ चे १५/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– प्रविण शंकरराव वरटकर वय ३४ वर्ष रा. घोराड ता. सेलु जि. वर्धा हा आपली मोटरसायकल क्र. एम. एच.– ३२/ए. एफ.– ७१८६ ने डबलसिट बसुन सेलु बाजारगाव कोंढाळी मार्गानी येत असता यातील आरोपी पांढऱ्या रंगाची कार क्र. एम. एच.– २७/डी. व्ही.– ५२५५ चे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटरसायकलला जोरदार धडक मारून अपघात करून फिर्यादीला जखमी केले. फिर्यादीची आई **मृतक नामे– सिताबाई शंकर वरटकर, वय ६० वर्ष रा. घोराड ता. सेलु जि. वर्धा** ही गंभीर जखमी झाल्याने तिला पुढील उपचाराकरीता प्राथमिक रूग्णालय कोंढाळी येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कार चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४, (अ) भादवि. सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास PSI सुरजुसे पो.स्टे कोंढाळी मो नं. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर